# न्यायाची गतीच न्यारी

दूरदर्शनवरील एका कार्यक्रमात एक चर्चासत्र पाहायला मिळालं. मृत्युदंड हवा की नको, असा विषय चर्चेला होता. दोन्ही बाजूंनी हिरीरीने मुद्दे मांडण्यात आले. अशा चर्चांमधून सर्वजण आपापल्या मतांवर ठाम असतात. पण दूरदर्शनमुळे सर्वंकष चर्चा ऐकायला मिळतात हा मोठाच फायदा आहे. चर्चेचा शेवट अर्थातच काहीच निष्कर्ष न काढताच झाला. कारण सर्वांचीच बाजू काही प्रमाणात बरोबर असते आणि विवाद हा नेहमी तसाच राहत असतो.

सर्वच संस्कृतींमधून न्यायदानाची संकल्पना रूढ होत गेली. हामुराबीच्या काळात न्यायदानात अपराधाबद्दल सूड म्हणून शिक्षेचा विचार झाला. त्यामुळे डोळा फोडला तर डोळा फोडायचा, दात पाडला तर दात पाडायचा आणि अर्थात जीव घेतला तर त्याचाही जीव घ्यायचा. मध्ययुगात अशाच प्रकारच्या शिक्षा असत आणि त्यांची अंमलबजावणी अत्यंत क्रूर पद्धतीने सार्वजनिकरीत्या केली जाई. अपराध्याला शिक्षा व्हावी, याबरोबरच असा अपराध भविष्यात घडू नये, म्हणून इतर सर्वांना जरब बसावी, असाही उद्देश यामागे असे.

याउलट अपराधी आणि गुन्हेगार हीसुद्धा माणसेच आहेत. तेही समाजाचे घटकच आहेत. सुधारण्याची संधी मिळाली तर त्यांचासुद्धा समाजाला उपयोग होऊ शकेल, अशा क्षमाशीलतेच्या विचारातून पुढे न्यायदानाची प्रक्रिया अशीही बदलत गेली की शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराध माणसाला शिक्षा होता कामा नये; असेही सूत्र पुढे आले. मग गुन्हा हा पुरेपूर प्रमाणात सिद्ध व्हायला हवा. थोडी जरा शंका वाटली तरी न्यायाधीशाने संशयाचा फायदा ज्याच्यावर आरोप आहे त्यालाच द्यायला हवा. शिक्षासुद्धा काटेकोरपणे गुन्हा जेवढा गंभीर स्वरूपाचा असेल त्याच प्रमाणात सौम्य किंवा कडक असावी, असेही सूत्र न्यायदानात रूढ झाले.

मग संतापाच्या भरात घडलेले कृत्य, स्वतःच्या किंवा मालमत्तेच्या बचावासाठी धडपड करीत असताना दुसऱ्याला झालेली इजा, दुसऱ्याचा जीव वाचवण्याच्या प्रयत्नात हल्लेखोराची झालेली हत्या असे अपराधांचे प्रकार सिद्ध झाले तर शिक्षाही सौम्य द्यावी, असेही तत्त्व पाळण्याचा प्रयत्न झाला. होता होता न्यायाची एकंदर प्रक्रियाच इतकी गुंतागुंतीची झाली, की खटल्यांचा निकाल अधिक अधिक विलंबाने लागायला लागला.

गुंतागुंतीमुळे आणि विलंबामुळे आपल्याकडे न्यायदान हा प्रकारच हास्यास्पद होऊन बसला आहे. शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, असंच सूत्र आता व्यवहारात अंमलात यायला लागलं आहे.

लवकरात लवकर न्याय मिळावा अशीच अपेक्षा सर्व लोकांची असते. या भावनेचं दडपण शासनावर येत राहतं. पण न्यायप्रक्रियेची गुंतागुंत हे सारं अशक्यच करून टाकते. गुन्हेगार मोकाट सुटलेले आहेत असं चित्र लोकांच्या मनात उभं राहणं लोकशाहीत शासनाच्या दृष्टीने फार धोक्याचं असतं. आमच्या राज्यात तसं होत नाही हे दाखविण्यासाठी टाडा, मोका यांसारखे कायदे केले जातात. चकमकीत मारले जाणाऱ्यांची संख्या वाढतच जाते. हे उपायसुद्धा धोक्याचेच आहेत.

न्यायाला विलंब हा अन्यायच आहे.

तो कसा आणि केव्हा दूर होणार आहे ?

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**